## काश्मीर खोऱ्यात गौंडवाडचा जवान शहीद
## उद्या अंत्यविधी

बेळगाव (प्रतिनिधी) : भारतीय सैन्य दलातील जवान आणि गौंडवाड गावचे सुपुत्र मारुती र्फ बाळ ू यल्लाप्पा पाटील (वय २७) हा श्रीनगर येथे अतिरेक्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटा त शहीद झाले. ही घटना रविवार दि. ७ सप्टेंबर रोजी सकाळी घडली. मारुती यांचा पार्थिव गुरुवार दि. ११ रोजी गौंडवाड गावी आणण्यात येणार आहे. गौंडवाड येथे या घटनेचे वृत्त पोहोचताच संपूर्ण गावावर शोककळा पसरली. गावातील नागरिकांनी मारुती पाटील यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन करू न धीर दिला. तसेच गावातील श्री मूर्तींचे सकाळीच विसर्जन करण्या त आले. मारुती पाटील यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण गौंडवाड येथेच झाले. त्यानंतर त्यांनी ज्योती महाविद्यालयात पीयुसीपर्यंतचे शिक्षण घेतले आणि बेळगाव येथेच १२ मराठा सैन्य दलात ते भरती झाले. ते सैन्यात भरती होऊन७ वर्षे पूर्ण झाली होती. मारुती यांच्या पश्चात आई, वडील, ४ भाऊ, एक बहीण असा परिवार आहे. मारुती हे अविवाहित होते. मारुती हे गेल्या मे महिन्यात सुट्टीवर गौंडवाड या गावी आले होते. आपण खुशाल असल्याचे पत्र दोन दिवसांपूर्वीच गौंडवाडला पोहोचले होते. त्यानंतर लगेच त्यांच्या मृत्यूची खबर घरी पोहोचली.

## शहीद जवान मारुती पाटील यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

बेळगाव (प्रतिनिधी) : भारत-पाक सीमेवर आपले कर्तव्य बजाविताना शहीद बनलेल्या गौंडवाड गावचे सुपुत्र मारुती ऊर्फ बाळ ू यल्लाप्पा पाटील यांच्यावर आज दुपारी गौंडवाड गावी अंत्यसंस्कार करण्या त आले. गावच्या या सुपुत्रास हजारोंच्या उपस्थितीत साश्रूनयनाने अंतिम निरोप देण्यात आला. रविवार दि. ७ सप्टेंबर रोजी अतिरेक्यांबरोबरच्या चकमकीत मारुती चौगुले यांना वीरमरण प्राप्त झाले होते. प्रतापपूर, चंदीगढ, दिल्ली, गोवामार्गे का ल रात्री उशिरा कॅम्प येथील मराठा सेंटरमध्ये मारुती पाटील यांचे पार्थिव आणण्यात आले. आज सकाळी गौंडवाड गावी मारुती पाटील यांचे पार्थिव आणण्यात आले असता गावच्या वेशीवरच हजारोंच्या संख्येने उपस्थित लोकांनी 'भारतमाता की जय', 'शहीद मारुती पाटील अमर रहे'च्या घोषात अंत्ययात्रेस सहभागी झाले. अंत्ययात्रेसमोर एनसीसी छात्र , गौंडवाड, कंग्राळी व यमनापूर गावातील शाळांचे विद्यार्थी, भजनी मंडळी उपस्थित होते.फुलांनी सजविलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीवर मारुती पाटील यांचे पार्थिव ठेवण्या त आले होते. ट्रॅक्टरसमोर तिरंगा ध्वज हातात घेऊन शिस्तबद्ध चाललेला युवकवर्ग सभोवताली लष्करी जवान यामुळे अंत्ययात्रेतील वातावरण भारून गेले होते. अंत्ययात्रा गावातील प्रमुख मार्गांवरून फिरून ती गौंडवाड मराठी शाळेच्या मैदानावर आली. यामध्ये प्रामुख्याने गावातील मराठी, कानडी प्राथमिक शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जागोजागी नागरिक, युवक मंडळे, महिला, सामाजिक संस्थांच्या वतीने पार्थिवावर पुष्पहार अर्पण करू न आरती ओवाळण्यात येत होती. अंत्ययात्रेच्या संपूर्ण मार्गावर रांगोळी घालण्यात आली होती. विविध संस्थांच्या वतीने'शहीद मारुती पाटील अमर रहे' जयघोषाचे फलक

लावण्यात आले होते. संपूर्ण दिवसभर गावचे सर्व व्यवहार बंद ठेवून ग्रामस्थ अंत्ययात्रेत सहभागी झाले होते. होळी गल्ली येथील मारुती पाटील यांच्या निवासस्थानी अंत्ययात्रा पोहोचताच एकच गलका उडाला. पाटील कुटुंबियांतील सदस्यांनी आपल्या लाडक्या मुलांचे अंतिम दर्शन घेताना दु:खाने हंबरडाफोडला. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित महिलांनाही आपले अश्रू आवरणे कठीण बनले. यावेळी परिसरात झालेल्या मोठ्या गर्दीमुळे कार्यकर्ते, पोलिस व लष्करी जवानांनाही काहीकाळ गर्दीवर नियंत्रण ठेवता आले नाही. याठिकाणी काही विधी पार पाडल्यानंतर अंत्ययात्रा गौंडवाड स्मशानभूमीत पोहोचली. गौंडवाड स्मशानभूमीत बेळगावचे महापौर संभाजी पाटील, मराठा सेंटरचे कॅप्टन धिरेश त्रिपाठी, सुभेदार बी. सूर्यवंशी, सुभेदार सुभाष गरग, नाईक सुभेदार लक्ष्मण माऊथ यांनी १२ मराठाबटालियन, ५ मराठा बटालियन कमांडंट, डेप्यु. कमांडंट या विभागाच्या वतीने पुष्पचक्रे वाहून मानवंदना दिली. यावेळी लष्करी अधिकाऱ्यांनी बिगुलावर शोकधून वाजविली. बंदूकधारी जवानांनी आपल्या रायफल उलट्या करून मानवंदना दिली. हजारोंच्या संख्येने उपस्थित जमावात यावेळी स्तब्धता दिसून आली. यानंतर अनेक गावातील ग्रामपंचायत सदस्य, महानगराचे नगरसेवक, शैक्षणिक-सामाजिक व सहकारी पतसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी पार्थिवावर पुष्पचक्र व पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. शहीद मारुती पाटील यांच्या पार्थिवासोबत सियाचीन येथून आलेले सुभेदार पांडुरंग जाधव व नाईक सुभेदार महेश पाटील यांनी ७ सप्टेंबर रोजी घडलेल्या घटनेची माहिती दै. पुढारीशी बोलताना दिली. पांडुरंग जाधव म्हणाले, भारत-पाक सीमेवरील सियाचीन ग्लॅशर विभाग हा अत्यंत दुर्गम मानला जातो. १८ हजारफूट उंचीव रखराब हवामानास तोंडदेताना भारतीय जवानांना शत्रूच्या कारवाया हाणून पाडण्याची महत्त्वाची जबाबदारी पार पाडावी लागत असते. १९८४ सालापासून या विभागातून होणारी अतिरेक्यांची घुसखोरी पाहता मोठा बंदोबस्त ठेवला जात आहे. जवानांना सदोदित या विभागात धावपळ करावी लागत असते. रविवार दि. ७सप्टेंबर रोजी ही भारतीय जवानांची एक तुकडी प्रतापपूर सेक्टर विभागात चालली असताना सायंकाळी साडेपाचच्या सुमारास या तुकडीवर अतिरेक्यांनी बॉम्बवर्षाव केला. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे भारतीय जवानांना संरक्षणात्मक पवित्रा घेत असताना मारुती पाटील गंभीररित्या जखमी झाला होता. त्यास अशाही अवस्थेत नजीकच्या रुग्णालयात हलविण्यात आले; परंतु उपचार सुरू असतानाच मंगळवार दि. ९ सप्टेंबर रोजी मारुती पाटील यास मयत घोषित करण्यात आले. अंत्ययात्रेत दीपक दळवी, शिवाजी सुंठकर, प्रकाश शिरोळकर, अशोक मोदगेकर ,बाबुराव पिंगट, कंग्राळी ग्रापं. अध्यक्ष गजानन पाटील, आर. एल. मैलण्णावर, बाळ भोसले, नगरसेवक गजानन पाटील, नगरसेवक आप्पासाहेब पाटील, ज्योती कॉलेजचे प्राचार्य ए. के. घोरपडे, माजी प्राचार्य एस. वाय. पाटील, दिलीप पलंगे, प्रकाश मरगाळे, विकास कलघटगी ,राजू मरवे, गंगाधर बिर्जे, नारायण माळवी, माजी नगरसेवक नेताजी जाधव, मनोहर काद्रोळकर, बसवंत रेडेकर, चांगप्पा खन्नूकर, हणमंत बिर्जे, रामा बिर्जे, विलास बिर्जे, सुरेश होनगेकर, राजेंद्र पवार सहभागी झाले होते.

शहीद मारुती पाटील यांच्यावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार



कंग्राळी -
देशासाठी शहीद झालेल्या वीर जवान मारुती बाळू यल्लाप्पा पाटील यांच्यावर गौंडवाडच्या स्मशानभूमीत लष्करी इतमामात व हजारोंच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी संपूर्ण गाव शोकसागरात बुडाला होता.
गौंडवाड गावचा सुपुत्र मारुती पाटील वय २७ याला सोमवार दि. ८ रोजी जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांशी लढताना वीरमरण आले. ही बातमी कुटुंबियांना दूरध्वनीवरून कळताच दुखाचा डोंगर कोसळला. गुरुवारी दिल्लीहून शहीद मारुती पाटीलचे पार्थिव विमानाने गोव्यात आणण्यात आले. त्यानंतर लष्कराच्या वाहनातून शहीद पाटीलचे पार्थिव बेळगावच्या मराठा लाईट इन्फंट्री येथे आणण्यात आले. तेथे शहीद पाटीलचे अंत्यदर्शन घेतल्यानंतर पार्थिव सजविलेल्या ट्रॅक्टरवरून गौंडवाड येथे आणण्यात आले. यमनापूर येथून शहीद पाटीलच्या पार्थिवाची मिरवणूक गौंडवाडकडे निघाली. शहीद जवान मारुती पाटील अमर रहे, भारतमाता की जय अशा घोषणा देण्यात आल्या. मिरवणुकीत विविध शाळांचे शिक्षक, परिसरातील युवक मंडळे व शिवसेनेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. शहीद जवानाचे दर्शन घेण्यासाठी दुतर्फा गर्दी झाली होती. मारुतीचे पार्थिव घरी नेण्यात आले तेव्हा कुटुंबियांनी एकच आक्रोश केला. नंतर त्याचे पार्थिव स्मशानभूमीत आणण्यात आले. स्मशानभूमीवर कॅप्टन एस. त्रिपाठी, चिफ ऑफ दी आर्मी स्टाफ, कोलोनेल ऑफ रेजिमेंट, कमांडंट एम. एल. आय. आर. सी., सी. ओ. १२ मराठा, सी. ओ. ५ मराठा आदी विभागाच्या अधिकारी आणि जवानांनी शहीद मारुती पाटीलला मानवंदना दिली.

## शहीद जवानाला भाजपची श्रद्धांजली

बेळगाव (प्रतिनिधी): काश्मीरखोऱ्यात अतिरेक्यांच्या बॉम्ब हल्ल्या शहीद झालेल्या गौंडवाड येथील जवान मारुती यल्लाप्पा पाटील यांना भाजपच्यावतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.
भाजप जिल्हाध्यक्ष सुरेश अंगडी, शंकरगौडा पाटील यांच्या नेतृत्वाखाली गौंडवाड येथे भेट देऊन शहीद जवानाच्या कुटुंबियांचे सांत्वन करण्यात आले. शहीद जवानाच्या प्रतिमेला पुष्पहार घालून दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. यावेळी भागोजीराव पाटील, मुरग्याप्पा संबन्नावर, अडवी शिटगी, संजीव हणमसागर, मायाप्पा सिंगाडी, सी. एम. पाटील, राजू गुळण्णावर, बसनगौडा सिद्रामनी आदी उपस्थित होते.

शहीद जवान मारुती पाटील यांच्यावर अंत्यसंस्कार

सकाळ वृत्तसेवा

बेळगाव, ता. १२ : गौंडवाड (ता. बेळगाव) येथील रहिवासी व मराठा लाईट इन्फंट्रीच ा शहीद जवान मारुती यल्लाप्पा पाटील यांना 'अमर रहे'च्या जयघोषात, साश्रूपूर्ण नयनांनी आज अखेरचा निरोप दिला. गेल्या मंगळवारी काश्मी रयेथे अतिरेक्यांच्या हल्यात त्याला वीर मरण आले होते. .......

....... आज खास विमानाने त्यांचे पार्थिव गोव्याला आणण्यात आले. तेथून मराठा लाईट इन्फंट्रीच्य ा जीपमधून ते बेळगावला आणण्यात आले. येथील मराठा लाईट इंन्फट्रीत मानवंदना दिल्यानंतर ते गौंडवाडला नेण्यात आले. पार्थिव सकाळी साडेनऊ वाजता यमनापूरच्या वेशीत येताच उपस्थित शालेय विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी शहीद मारुती पाटीलचा जयजयकार केला.

'शहीद मारुती पाटील अमर रहे', 'भारतमाता की जय' आदी घोषणा देण्यात येऊ लागल्या. गौंडवाड ग्रामस्थातर्फे शही द मारुतीच्या पार्थिवाला अभिवादन करण्या त आले. त्यानंतर गावकऱ्यांनी खास सजविलेल्या ट्रॅक्टरमध्ये पार्थिव ठेवण्यात आले. पार्थिव तिरंग्यामध्ये गुंडाळलेल्या शवपेटीत ठेवण्यात आले होते. यमनापूर येथूनच शहीद मारुती पाटील यांच्या पार्थिवाची अंत्ययात्रा सुरू झाली. अंत्ययात्रेत कंग्राळी बुद्रुक येथील पदवीपूर्व महाविद्यालय, कन्या विद्यालय, गौंडवाड येथील महात्मा गांधी विद्यालय, यमनापूर येथील बेन्सन्स इंग्रजी माध्यम शाळा तसेच गौंडवाड, कंग्राळी बुद्रुक व यमनापूर येथील मराठी व कन्नड प्राथमिक शाळा, विविध युवक संघटना व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

अंत्ययात्रा गौंडवाड गावच्या वेशीत येताच गावकऱ्यांना गहिवरून आले. सर्वांचे डोळे अश्रुंनी दाटले. गावात अंत्ययात्रेच्या संपूर्ण मार्गावर रांगोळी काढण्या त आली होती. जागोजागी 'शहीद मारुती पाटील अमर रहे'चे फलक लावण्यात आले होते. ठिकठिकाणी पार्थिवाला आरती ओवाळून पुष्पवृष्टी करण्या त येत होती. पार्थीव काह ी वेळ त्यांच्या निवासस्थानी ठेवण्यात आले. त्यावेळी त्यांचे आई-वडील व कुटुंबियाना शोक अनावर झाला. गावातून सुमारे चार तास अंत्ययात्रा निघाली होती. गौंडवाड गावच्या स्मशानभूमीत तिची सांगता झाली.

स्मशानभूमीत मराठा लाईट इंन्फंट्रीतर्फे कॅप्टन बी. त्रिपाठी, बेळगाव महापालिकेतर्फे महापौर संभाजी पाटील, आमदार एस. सी. माळगी, दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळाचे सचिव प्राचार्य एस. वाय. पाटील, ज्योती महाविद्यालयाचे प्राचार्य ए. ए. घोरपडे, युवा आघाडीचे दीपक दळवी, नगरसेवक प्रकाश शिरोळकर, माजी महापौर शिवाजी सुंठकर, कंग्राळी पदवीपूर्व महाविद्यालयाचे प्राचार्य आर. के. कुट्रे, शिवसेना तालुकाप्रमुख अशोक मोदगेकर, तालुका पंचायत सदस्य तानाजी पाटील, कंग्राळी ग्रामपंचायतीचे अध्यक्ष गजानन पाटील, टोपाण्णा पाटील, बाबूराव पिंगट, चांगुणा पाटील, नेताजी जाधव, आप्पा पाटील आदींनी शहीद मारुती पाटील यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र वाहून आभिवादन केले.

त्यानंतर महापौर संभाजी पाटील, आमदार एस. सी. माळगी, ग्रामपंचायत अध्यक्ष गजानन पाटील, प्राचार्य एस. वाय. पाटील, एस. के. पाटील, महसूल खात्याचे विभागीय निरीक्षक पी. एस. पाटील, दीपक दळवी, कलमेश्व रसोसायटीचे अध्यक्ष गजानन अष्टेकर, श्रीमती एस. व्ही. देसाई, नेताजी जाधव, प्रकाश शिरोळकर, आर. के. कुट्रे, शिवाजी सुंठकर, नगरसेवक गजानन पाटील, बाबूराव कोकितकर, बाबूराव पिंगट यांची श्रद्धांजलीपर भाषणे झाली.

आमदार माळगी यांनी गौंडवाड रस्त्याचे 'शहीद मारुती पाटील मार्ग' असे नामकरण करण्याच ी सूचना केली. त्यांच्या नावाने गौंडवाड गावात स्मृतिभवन उभारावे, त्यासाठी आमदार निधीतून साह्य करण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

मराठा लाईट इन्फंट्रीच्य ा जवानांनी बंदुकीच्या हवेत फैर ी झाडून शहीद जवानाला मानवंदना दिली. त्यानंतर विधिपूर्वक पार्थिवाला मंत्राग्नी देण्यात आला.